10-7-06

PAGE No.:
DATE: / /

# प्रकरण पहिले

## * आंतरराष्ट्रीय संबंध (अर्थ, स्वरूप, व्याप्ती, महत्व)

### ★ व्याख्या

1) **हॅन्सजे मॉर्गेथॉ :-** यांनी त्यांच्या 'politices - Amongnation' या ग्रंथात ही व्याख्या सांगितली आहे. "आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे राष्ट्र-राष्ट्रातील संघर्ष आणि सत्तेचा वापर करणे होय."

2) **हेरॉल्ड स्पाउट :-** "आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे स्वतंत्र्य राष्ट्रीय समाजाचा उद्देश अथवा हितसंबधाच्या परस्पर विरोधामुळे निर्माण होणाऱ्या क्रिया व प्रतिक्रिये-चा अभ्यास होय."

3) **हार्ड मन :-** "एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राच्या हितसंबंधाशी आपल्या राष्ट्राच्या हितसंबधाची जुळवणी ज्या प्रक्रियेच्या द्वारे करीत असते त्या प्रक्रियेला आंतरराष्ट्रीय संबंध असे म्हणतात."

4) **क्वाप्सी राईट :-** "आंतरराष्ट्रीय संबंध म्हणजे दोन किंवा अधिक शक्तीशाली राष्ट्रामधील संबंध होय."

5) नॉर्मन हिल :-
" आंतरराष्ट्रीय संबंध म्हणजे राज्या - राज्यातील संबंधीत वृत्तीचा अभ्यास होय "

## ★ आंतरराष्ट्रीय संबंध व आंतरराष्ट्रीय राजकारण यातील फरक

आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये बऱ्याचदा आंतरराष्ट्रीय राजकारण हा शब्द समान अर्थाने वापरला जातो परंतु सुक्ष्म दृष्टया विचार केल्यास आंतरराष्ट्रीय संबंध व आंतरराष्ट्रीय राजकारण या दोन्ही संकल्पना परस्परापासून भिन्न आहेत यातील फरक पुढीलप्रमाणे सांगता येईल.

| | आंतरराष्ट्रीय संबंध | आंतरराष्ट्रीय राजकारण |
|---|---|---|
| i) | आ.रा. संबंध ही संज्ञा व्यापक स्वरूपाची आहे. | आ. रा. राजकारण ही संज्ञा मर्यादित अर्थानेच वापरण्यात येते. |
| 2) | आ. रा. संबंधामध्ये आर्थिक सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक अशा विविध अंगाने आंतरराष्ट्रीय संबंधाचा ~~वापरले जातात~~ अभ्यास केला जातो. | आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये केवळ राजकारणावरच अधिक भर देण्यात आलेला असतो. |

| पुरोगामी | प्रतिगामी |
|---|---|
| नवे | जुने |

| | आ. रा. संबंध | आ. रा. राजकारण |
|---|---|---|
| ३) | आ. रा. संबंधामध्ये विशिष्ट व्यक्ती अथवा व्यक्ती समूह यांच्या कृतीचा परिणाम राष्ट्रांच्या सिमापार होत असेल तर अशा सर्व कृतीचा अभ्यास आ. रा. संबंधामध्ये केला जातो | आ. रा. राजकारणामध्ये केवळ शासकीय बाजुनेच अध्ययन केलेले असते शासन करीत असलेल्या क्रिया प्रतिक्रियांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये केला जातो. |
| ४) | आ. रा. संबंध हा विचार वैचारिक व आंतरशास्त्रीय आहे तर | आ. रा. राजकारणामध्ये पूर्वीच्या काळी ऐतिहासिकता व वर्णनात्मकता होती. |

वरील प्रमाणे आंतरराष्ट्रीय संबंध आणि आंतरराष्ट्रीय राजकारण यातील फरक स्पष्ट करता येतो. खरे पाहिले तर आंतरराष्ट्रीय संबंधाचा आंतरराष्ट्रीय राजकारण हा गाभा आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या आधारावरच आंतरराष्ट्रीय संबंधाची विश्लेषण केले जाते.

C.T.B.T
(व्यापक अनवस्त्र-प्रसार बंदी करार)

## 2) आंतरराष्ट्रीय संबंधाचा विकास :-

आंतरराष्ट्रीय संबंधाची सुरूवात प्राचिन काळापासून झाली आहे तरी 1789 मध्ये जेरेमी बेन्थेम याने आंतरराष्ट्रीय संबंध हा शब्द उदयास आला साधारणपणे 1950 नंतर आंतरराष्ट्रीय संबंधाला अधिक गती प्राप्त झाली व एक स्वतंत्र विषय किंवा ज्ञानशाखा म्हणून मान्यता मिळाली.

कालखंड

1) १९०० - १९१९ . इतिहासाचे प्राध्यापक - [illegible]
2) १९१९ - १९३० Leage of Nationचे कार्य.
3) १९४५ - १९६० UNO -
4) १९६० - १९८५ शितयुद्ध.
5) १९८५ - १९९० नवशितयुद्ध.
6) १९९० पासून आंतरराष्ट्रीय संबंध या विषयाला अधिक चालना मिळाली.

1) १९०० - १९१९
१९१४ ते १९१८ या दरम्यान पहिले महायुद्ध लढले गेले 1905 मध्ये जपान ने रशियावर आक्रमण केले
1920 मध्ये जगामध्ये विजेत्या राष्ट्रांनी 'लीग ऑफ नेशन' ची स्थापना केली.

L खा खाजगीकरण   1991 मध्ये हे धोरण स्वीकारले
P उ उदात्तीकरण
G जा जागतीकरण - Gllobalisation
ग्लोबोलायझेशन

3) आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप :-

आंतरराष्ट्रीय संबंध हा एक व्यापक विषय आहे. राज्या-राज्याशी संबंधीत सर्वच कृतीचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधाचा केला जातो राज्याराज्यातील संबंधाचे स्वरूप परिस्थिती सापेक्ष बदलत आहे. नवनवीन जागतीक व्यवस्था अस्तीवात येताना निश्चीतच त्यांच्या स्वरूपामध्ये परिवर्तन होत आहे. आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप पुढील मुददयाच्या आधारे स्पष्ट करता येईल.

1) आंतरराष्ट्रीय संबंध एक व्यापक विषय :-

आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये राज्याराज्याशी संबंधीत असंख्य घटनाचा अभ्यास केला जातो. त्यामध्ये सत्ता संघर्ष आंतरराष्ट्रीय संघटना, आंतरराष्ट्रीय सत्ता समतोल, आंतरराष्ट्रीय शांतता व सहकार्य इ. चा उल्लेख करता येईल विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आं. रा. संबंधाची व्याप्ती वाढत गेली वरील सर्व घटनांचा अभ्यास करण्यासाठी एक स्वतंत्र अभ्यास विषयाची आवश्यकता भासु लागली त्यातून आं. रा. संबंध हा विषय व्यापक रीतीने वाढत चालला आहे.

2) आंतरशास्त्रीय दृष्टिकोनाचा अभ्यास विषय :-

आ. रा. संबंध हा विषय सामाजिक शास्त्राच्या पिढयाखालेत मोडतो आं. रा. संबंधाचा अभ्यास करीत असताना

११-९-२००१ मध्ये अमेरिकेत वर्ल्ड ट्रेड सेंटर उध्वस्त झाले
(UNO 'संयुक्त राष्ट्र संघटना' 1945 मध्ये स्थापन झाली व
United Nation organization उद्देश जगात शांतता असावी

इतरही सामाजिक शास्त्रांचा आधार घ्यावा लागतो. युद्ध व शांततेचा अभ्यास करताना त्यात्या परिसरातील भौगोलिक रचनेचा आणि मानसिकतेचाही विचार करावा लागतो. या सर्व घटनांचा प्रभाव आ.रा संबंधावर पडत असतो प्रत्येक राष्ट्र आपआपल्या राष्ट्रहिताचा विचार करीत असल्याने प्रत्येक राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणात विविधता दिसुन येते ही विविधता परिस्थिती सापेक्ष असते अर्थात आंतरराष्ट्रीय संबंध हा विषय इतर सामाजिक शास्त्राच्या आधारावरच उभा असतो. इतर सामाजिक शास्त्राच्या आधारे आंतरराष्ट्रीय घटनांचे विश्लेषण करता येते या विश्लेषणाच्या वर्तमान कालीन व भविष्यकालीन धोरणाचा अदावा घेता येतो त्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप आंतरशास्त्रीय आहे असे म्हणता येते. "क्वीन्सी राईट यांच्या मते आंतरराष्ट्रीय संबंध हा विषय इतर सामाजिक शास्त्रावर अधारलेले असतात."

3) आंतरराष्ट्रीय संबंध ही एक कला :-

क्वान्सी राईट यांच्या मते प्रत्येक ज्ञानशाखा ही सुरूवातीच्या काळात एक कलाच असते या कलेची योजनाबद्ध रित्या हुबेहुब मांडणी केलेस आपल्याला आपकील ध्येय मिळू शकते आ.रा. संबधात राजनय ही कलाच आहे या कलेतुन राष्ट्रा राष्ट्रामध्ये

फिडेल कॅस्ट्रो क्युबा या देशाचे पंतप्रधान होते व क्युबा हे साम्यवादी राष्ट्र आहे.

परस्पर सहकार्य किंवा संघर्षाची जाणीव निर्माण होत असते. यातूनच मित्र जोडता येतात युद्ध आणि संघर्षाचे वातावरण उभी करून परस्पर सहकार्याच्या मैत्रीपूर्ण वातावरणाची निर्मिती होऊ शकते व यातून राष्ट्रीय हितसंबंध निर्माण होऊ शकते.

4) आंतरराष्ट्रीय संबंध एक तत्त्वज्ञान :- कोणतेही तत्त्वज्ञान सुरुवातीला एक कला असते व कलेच्या माध्यमातून तत्त्वज्ञानाची जोपासना करता येते जगाच्या इतिहासाकडे वळून पाहिल्यास आपल्या लक्षात येईल की हिटलर किंवा मुसोलिनी सत्ता प्राप्त करताना कलात्मक रित्या आपले वगळे तत्त्वज्ञान मांडले व त्या तत्त्वज्ञानाच्या आधारावर आ. रा. संबंध प्रस्थापित केले त्यातूनच जागतिक राजकारणाला व परस्पर सहकार्य किंवा संघर्षाला सुरुवात झाली विशिष्ट तत्त्वज्ञानाच्या आधारावर कोन जग दोन गटात विभागले गेले. एक साम्यवादी तत्त्वज्ञान दुसरे भांडवलवादी तत्त्वज्ञान या तत्त्वज्ञानामधून जागतिक राजकारणाची तत्त्वे ठरू लागली तात्पर्य असे की आ. रा. संबंधाचे स्वरूप बऱ्याचदा तत्त्वज्ञानात्मक असते.

5) सत्ता संघर्षाशी संबंधीत शास्त्र :- सत्ता हा कोणत्याही राष्ट्राच्या मध्यवर्ती घटक असतो सत्ता

" Political Science is master of science"
'ॲरिस्टॉटल'

PAGE NO.:
DATE: / /

प्राप्त करणे त्यामध्ये वृद्धी करणे व ती टिकवून ठेवणे यांची प्रक्रिया सतत चालूच असते आं. रा. संबंधाचे विचारवंत मॉर्गेथॉ असे म्हणतात की, आंतरराष्ट्रीय संबंध हे एक सत्तेशी संबंधीत शास्त्र आहे.

सत्ता प्राप्त करणे व त्यामध्ये वृद्धी करणे तिचे संवर्धन यासाठी प्रत्येक राष्ट्र कार्यशील असते. आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये राष्ट्र-हितासाठी सत्तेचा वापर करणे हे प्रमुख तत्त्व आंतरराष्ट्रीय संबंधात असते. यामुळे मॉर्गेथॉ असे म्हणतो की; आंतरराष्ट्रीय संबंध हे एक सत्तेशी संबंधीत शास्त्र आहे.

आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करत असताना वेगवेगळ्या प्रदेशावर आपला ताबा मिळवला जातो. परिणामता वेगवेगळे संघर्ष निर्माण होतात या संघर्षातून कधी-कधी युद्धी होऊ शकते. सत्तेमध्ये लोकसंख्या, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था विचारप्रणाली व नेतृत्त्व यांचा समावेश करता येतो. या माध्यमातुन राष्ट्राच्या उद्दिष्टाची पूर्तता केली जाते.

6) आंतरराष्ट्रीय संबंध एक समन्वयाचे शास्त्र :

आंतरराष्ट्रीय संबंधाचे कधी परस्पर सहकार्याचे तर कधी परस्पर संघर्षाचे वातावरण असते. अर्थात आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये बऱ्याचदा समन्वयाचा विचार केला जातो याच भूमिकेतून भरिव अर्थ केलेले आहे.

★ UNECO
(United Nation Educational cultural organization)

तर UNO अराजकीय क्षेत्रात UNO ने भरीव कार्य केलेले

7) आंतरराष्ट्रीय संबंधाचे मुल्यसापेक्ष स्वरूप :- आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप हे मुल्याला धरून असतात. जागतीक राजकारणाला आदर्शवादी दिशा देण्यासाठी आंतरराष्ट्रीय संबंधाचे मुल्य सापेक्ष स्वरूप असते बऱ्याचदा ते स्वरूप मुल्य निरपेक्ष सुध्दा असु शकते. नैतीक मुल्य आंतरराष्ट्रीय राजकारणात रूजविण्यासाठी व जागतीक शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप हे मुल्यसापेक्षच असते.

8) आंतरराष्ट्रीय संबंध एक सामाजीक शास्त्र :- इतर सामाजीक शास्त्रा-प्रमाणे आंतरराष्ट्रीय संबंध हा विषय सुध्दा एक सामाजीक शास्त्राच आहे. सामाजिक शास्त्र हे मानवी वर्तनाशी संबंधीत असते. मानवी वर्तनाला आनुसरूनच सामाजीक शास्त्राचे नियम ठरत असतात सामाजिक शास्त्र ही सातत्याने परिवर्तनशील असतात कारण मानवी स्वभावच परिवर्तनशील आहे त्यामुळे इतर सामाजीक शास्त्राप्रमाणे आंतरराष्ट्रीय संबंधाचे नियम आणि स्वरूप सुध्दा परीस्थिती सापेक्ष बदलत असते.
वरील प्रमाणे आंतरराष्ट्रीय संबंधाचे पारंपारिक स्वरूप स्पष्ट करता येईल.

① अमरीका :- भांडवलशाही
② रशिया :- साम्यवाद



## * आंतरराष्ट्रीय संबंधाचे बदलते स्वरूप :-

आंतरराष्ट्रीय संबंध हा विषय व्यापक आणि विकसनशील विषय आहे आंतरराष्ट्रीय राजकारण, विज्ञान, तंत्रज्ञानातील प्रगती मानवी स्वभावातील परिवर्तनशीलता या कारणामुळे आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप सुद्धा बदलत चालले आहे. ते बदलते स्वरूप पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

1) वसाहत वादयांचा अंत / ह्रस्त :-

वसाहतवादी राष्ट्रांच्या प्रवृत्तीत 1945 च्या नंतर बदल झाला. जगाकडे पहाण्याची दृष्टी बदलली जोपर्यंत ही प्रवृत्ती नष्ट होत नाही तोपर्यंत जगात सामंजस्य निर्माण होणार नव्हते पूर्वीच्या काळी विविध देशांनी आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी अनेक राष्ट्रामध्ये वसाहती निर्माण केल्या परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील बहुतांश राष्ट्रे स्वतंत्र झाली व जगातील वसाहत वादाचा अंत झाला व आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप पूर्णतः बदलून गेले पूर्वीचा वर्चस्ववादी विचार दूर जावून परस्पर शांतता व सहकार्याचा विचार पुढे आला.

2) नवस्वतंत्र्य राष्ट्रांचा उदय (व नवोदित राष्ट्रे)

वसाहतवादाचा अंत झाल्यानंतर आशिया व आफ्रिका खंडातील अनेक राष्ट्रे स्वतंत्र्य झाली त्या स्वतंत्र्य राष्ट्रांनी

आपआपले स्वतंत्र्य परराष्ट्र धोरण आखण्यात सुरूवात केली. प्रत्येक राष्ट्र आपआपल्या अस्तीत्वासाठी जागतीक व्यासपिटावर प्रयत्नशील झाले. इतर देशांशी आपले चांगले संबंध प्रस्थापित करणे आवश्यक वाटू लागले त्यासाठी या नवोदित राष्टांनी आपले परराष्ट्र धोरण स्वतंत्र्य रित्या स्विकारण्यात सुरूवात केली त्यातुन नवोदित राष्टांना जगाच्या व्यासपिटावर वेगळे राजकीय महत्व प्राप्त होऊ लागले.

3) जागतीक लोकमताला महत्व :→ आंतरराष्ट्रीय संबंधात जागतीक लोकमताही विशेष महत्व असते जागतीक लोकमत जर अनुकूल नसेल तर कोणत्याही सत्तेला आंतरराष्ट्रीय र निर्णय घेणे कठीण असते लोकमत हा लोकशाही राज्याचा पाया असतो लोकमत हा विश्वासात घेतल्याशिवाय लोकशाहीतील राज्यसभा आपले निर्णय घेऊ शकत नाही. म्हणून आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करताना दुसऱ्या महायुद्धानंतर लोकमताला विशेष महत्व प्राप्त झाले. तात्पर्य असे की, आंतरराष्ट्रीय संबंधाच्या बदलत्या स्वरूपात जागतीक लोकमताला महत्वाचे स्थान प्राप्त झाले.

उदा :- अमेरिकेने इराकवर आक्रमण केले तेव्हा जगातील बहुतांश राष्ट्रांनी अमेरिकेच्या या आक्रमणाचा निषेद केला होता.

ISM म्हणजे वाद मुळ विचार
(URO) हे चलन आहे

PAGE No.:
DATE: / /

४) **आर्थिक सत्तेला प्राधान्य :-**

आंतरराष्ट्रीय संबंधाच्या स्वरूपामध्ये पारंपारिक आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये राष्ट्रसत्तेला अधिक महत्त्व दिले जात असे राजकीय दृष्ट्या एखादी सत्ता प्रबळ असेल किंवा सैनिकांच्या बळावर ती सत्ता अस्तीवात असेल परंतु अलीकडे आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये आर्थिक घटकाला अधिक महत्त्व मिळाले आहे जागतिक सत्तेचा आधार राजकीय स्वरूपात न राहता तो आर्थिक स्वरूपाचा झालेला आहे. अर्थात जी राष्ट्रे आर्थिक दृष्ट्या संपन्न असतील त्या राष्ट्रांचेच प्राबल्य जगात निर्माण होत आहे.
उदा :- अमेरिका, फ्रान्स, जपान इ.

५) **अनवस्त्र निर्मिती व महासत्ताचा उदय :-**

दुसऱ्या महायुद्धानंतर जगात दोन महासत्ता निर्माण झाल्या होत्या (1) भांडवलशाहीवर आधारीत अमेरिका व दुसरी (2) साम्यवादावर आधारीत रशिया या दोन्ही महासत्तानी मोठ्या प्रमाणात अनवस्त्र निर्मितीस प्रारंभ केला त्यामुळे जगातील इतर लहान - सहान राष्ट्रानी सुध्दा अनवस्त्र निर्मितीस प्रयत्न चालु केले. प्रत्येक राष्ट्र आपआपल्या परीने शस्त्राअस्त्रामध्ये वाढ करण्याचा प्रयत्न करु लागले. शस्त्र निर्मितीची स्पर्धा आणि जगातील महासत्ताच्या वाढत्या महत्त्वकांक्षा याच्या सुध्दा अभ्यासाचे अवलोकन करण्याचे स्वरूप आंतरराष्ट्रीय संबंधाला मिळाले.

# NAM (अलिप्ततावाद) ही संघटना पंडीत जवाहरलाल नेहरू
चळवळ
(none Aliment movement) यांनी स्थापन केली,
नॉन अलाजमेंट मुव्हमेंट # नासेर, टिटो, नेहरू यांनी ही संघटना स्थापन केली.

6) आंतरराष्ट्रीय संघटनांची निर्मिती :-

पारंपारिक आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप हे वेगळे होते. 1945 नंतर जगात वेगवेगळ्या संघटना अस्तीवात आल्या. उदा :- सिटो, सिआटो, आशियन, यार्क, ओबेक इ. या संघटनांच्या निर्मितीचा उद्देश जगात राष्ट्रा-राष्ट्रातील संबंध सुधारणे व जागतीक शांतता कायम ठेवणे अशाच स्वरूपाचे होते. तात्पर्य असे की, आंतरराष्ट्रीय राजकारण नव्याने विविध संघटना निर्माण झाल्या. या संघटना आंतरराष्ट्रीय संबधाच्या अभ्यासाला वेगळे स्वरूप प्राप्त करून देतात.

7) नवनवीन संकल्पनांचा उदय :-

आंतरराष्ट्रीय संबधामध्ये नवनवीन संकल्पनाचा उदय झाला. या नव्या संकल्पनामध्ये जागतीकीकरण, खाजगीकरण, उदात्तीकरण या नवीन संकल्पना जगात रूढ झाला. त्यानुसार आंतरराष्ट्रीय संकल्पना जर संबंधामध्ये खूप मोठे बदल घडून येत आहेत. विश्व खेडे बनत चालले आहे. जागतीक सरकार चा विचार पुढे येतो आहे. तात्पर्य असे की आंतरराष्ट्रीय संबंधाला या नवनवीन संकल्पनेमुळे एक वेगळे स्वरूप प्राप्त झाले आहे.

वरील प्रमाणे कालओघामध्ये आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप हे सातत्याने बदलत चालले आहे. माणुस हा परिवर्तनशील प्राणी आहे. आंतरराष्ट्रीय संबंध एक सामाजीक

जगातील आंतरराष्ट्रीय संघटनी स्वीत्झर्लंड मध्ये मध्यात्
# 'हेग' या शहरात आहे. न्यायालय

शास्त्र आहे. आंतरराष्ट्रीय संबंध हे सामाजीक शास्त्राच्या नियमाप्रमाणे बदलत असते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरुप सुध्दा बदलत चाललेले आहे. क्विन्सी राईट या विचारवंताच्या मते आंतरराष्ट्रीय संबंध हे राज्याराज्यातील कृतीचा अभ्यास असतो. या कृती सातत्याने परिवर्तनशील असतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरुप सुध्दा परिवर्तशील आहे.

## ★ आंतरराष्ट्रीय संबंधाची व्याप्ती / कार्यक्षेत्र (Scope)

आंतरराष्ट्रीय संबंध हा सर्वव्यापी विषय आहे. याचे कार्यक्षेत्र खूप मोठे आहे. आंतरराष्ट्रीय घडामोडी जागतीक राजकारण आणि सत्ता संघर्ष विविध आंतरराष्ट्रीय विचारप्रणाली यांचा अभ्यास आपण आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये करीत असतो.

कोणत्याही विषयाची व्याप्ती म्हणजे त्या विषयाचे कार्यक्षेत्र होय. किंवा त्या विषयाचे अभ्यासाचे घटक होय. आंतरराष्ट्रीय संबंध या विषयाचे कार्यक्षेत्र होय.

आंतरराष्ट्रीय संबंधाची व्याप्ती पुढील मुद्द्याच्या आधारे स्पष्ट करता येईल.

1) राष्ट्रा-राष्ट्रातील संबंध :-

आंतरराष्ट्रीय संबंध म्हणजे राष्ट्राराष्ट्रातील संबंधाचा अभ्यास करणारे शास्त्र होय. असे म्हटले जाते. आ.रा. संबंध या विषयामध्ये राष्ट्र-राष्ट्रातील संबंधाचा अभ्यास केला जातो. प्रत्येक राष्ट्र त्याची भौगोलीक रचना विचारप्रणाली, सांस्कृतीक वारसा, आर्थिक परिस्थिती यामध्ये भिन्नता असते.

त्यामुळे राष्ट्राराष्ट्रातील हे संबंध मैत्रीचेच असतील असे मानता येत नाही. कधी ते परस्पर मैत्रीचे असतील तर कधी परस्पर संघर्षाचे असतील त्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये अशा सर्वच संबंधाचा अभ्यास केला जातो.

2) परराष्ट्र धोरणाचा अभ्यास :-

आ. रा. संबंधामध्ये परराष्ट्र धोरणाचा सुद्धा अभ्यास केला जातो. एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रा संबंधीत जे धोरण ठरवीत असते त्यामध्ये राष्ट्रहिताला महत्त्व देण्यात येत असते तात्पर्य असे की, प्रत्येक राष्ट्र आपले स्वतःचे राष्ट्रहीत लक्षात घेऊनच परस्पर धोरणाची आखणी करीत असते.

परराष्ट्र धोरण ठरविताना — - — —

— ——— ——— — —

— —

परराष्ट्र धोरण
जागतीक राजकारणाचाही विचार केला जातो जगात घडणाऱ्या गोष्टी विचारात घेऊन परराष्ट्र धोरणात ठरविले जाते.
अशा परराष्ट्र धोरणाचा अभ्यास आंतराष्ट्रीय संबंधामध्ये केला जातो.

3) सत्ता संघर्षाचा अभ्यास :-

आ. रा. संबंधामध्ये प्रत्येक राष्ट्र जागतीक पातळीवर सत्ता प्राप्त करण्याचा प्रयत्न करीत असते. सत्ता जर मिळाली नाही तर आ. रा. राजकारणामध्ये स्वतःच्या अस्तित्वासाठी तरी संघर्ष केला जातो. अशा संघर्षाचा अभ्यास आ. रा. संबंधात केला जातो. मार्गेथाँ च्या मते आ. रा. राजकारणात सत्ता हा घटक अधिक महत्त्वाचा असतो प्रत्येक राष्ट्र सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करीत असते.

DATE : / /

समारोप :-

सारांश रूपाने असे सांगता येईल की आंतरराष्ट्रीय संबंध हा विषय व्यापक असल्याने याची व्याप्ती वाढत चालली आहे "स्टनले हापुमन" हा विचारवंत आंतरराष्ट्रीय संबंधाच्या व्याप्ती संदर्भात असे म्हणतो की, आंतरराष्ट्रीय संबंधाची व्याप्ती म्हणजे जगात घडणाऱ्या अनेक लहान - साहान घटनांची नोंद ठेवणारे शास्त्र होय."

## आंतरराष्ट्रीय संबंधाचे महत्त्व :-

### 1) प्रस्तावना :-

जगामध्ये आधुनिक काळात राष्ट्रा-राष्ट्रातील परस्परावलंबन वाढले आहे त्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंध हा विषय अधिक महत्त्वपूर्ण होत आहे. जगात घडणाऱ्या राजकीय घटनांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या प्रत्येक स्तरावर राष्ट्रावर परिणाम होत असतो. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे जग अधिक गतीमान झाले आहे त्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधाचे अध्ययन करणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. आंतरराष्ट्रीय संबंधाला सैद्धांतिक आणि वास्तविक पातळीवर विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

आंतरराष्ट्रीय संबंध या विषयाचे महत्त्व क्वीन्सी राईट, पामर व परकीन्स या विचारवंतानी स्पष्ट केले आहे. आंतरराष्ट्रीय संबंधाचे महत्त्व पुढील मुद्दयांच्या

PAGE NO.:
DATE : / /

आधारे स्पष्ट करता येईल.

1) राष्ट्रा-राष्ट्रातील संबंध समजुन घेण्यासाठी :-
जगात प्रत्येक राष्ट्र आपआपले हीतसंबंध पुर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असते. विचारप्रणाली आणि वेगवेगळ्या शासन पध्दती यांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये केला जातो. आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करताना राष्ट्रा-राष्ट्रांचा परस्परांचा प्रभाव पडतो. पण राष्ट्रीय हीतसंबंध हा आंतर--राष्ट्रीय संबंधाचा प्रमुख उद्देश असतो. इंग्लंडचे पंतप्रधान 'लॉर्ड पामर्स्टन' यांनी त्यांचे उद्दिष्ट्य स्पष्ट करताना एकदा असे म्हणाले की, इंग्लंडला कायमचा मित्र नाही. अथवा कायमचा शत्रु नाही. कायमचे आहेत ते फक्त 'राष्ट्रीय हितसंबंध' या जागतीक घडामोडीच्या विश्लेषणातुन राष्ट्रा-राष्ट्रातील संबंध यांचे आपणास ज्ञान होते.

2) मानवी अस्तित्व आणि विकास :-
आंतरराष्ट्रीय शांतता आणि कल्याणासाठी त्याचबरोबर माणसाच्या राहणी-मानात विकास करण्याकरिता आंतरराष्ट्रीय संबंध अभ्यासने आवश्यक असते. त्यामुळे कोणते राष्ट्र किंवा कोणत्या राष्ट्रातील जनतेला कोणती परिस्थिती फलदायी ठरु शकते याचा विचार आंतरराष्ट्रीय संबंधात होत असतो. त्याचबरोबर प्रत्येक राष्ट्रासमोर जागतीक स्वरूपाची अनेक अव्हाने असतात या अव्हानातुन मार्ग काढण्यासा

दूर दृष्टीची देण्याचे काम आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासातुन होत असते. भावी काळात येणाऱ्या अडचणीवर या ज्ञानावर मात करता येतात.

3) समस्यांची जाणीव आणि नियंत्रण करण्यासाठी :-
आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासातुन सर्वच प्रश्नांची सोडवणुक करता येईल असे नाही. परंतु आंतरराष्ट्रीय राजकारणात असलेल्या समस्या समजुन घेऊन त्या कमी करता येतील किंवा संभाव्य नुकसान तरी टाळता येईल अर्थात जागतीक समस्यांची जाणीव झाल्यास जिच्यावर नियंत्रण करण्याचा आपण जर प्रयत्न केला तर त्या समस्येची तीव्रता तरी कमी होईल.

4) व्यापक दृष्टी आणि संतुलन :-
आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासामुळे सर्व जगाची आपल्याला ओळख होते. जग कसे आहे. आणि जग कसे असायला पाहिजे याची व्यापक दृष्टी आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासातुन येत असते. जागतीक घटनांची विश्लेषण जर व्यापक दृष्टीने केले तर चांगले निष्कर्ष निघतात. भविष्य काळात काय घडु शकते याचा अंदाज बांधता येतो या विषयाच्या अभ्यासकाला जग हीच प्रयोगशाळा मानुन विविध दृष्टीचा अवलंब करून कठीण प्रश्न सोप्या मार्गाने कसे सुटतील याचा विचार करावा लागतो.

5) सामान्य ज्ञानासाठी उपयुक्त :-
जगातील विविध राष्ट्रामध्ये सामाजीक, सांस्कृतीक भिन्नता असते. या भिन्नतेतुन जगाचे सामान्य ज्ञान आपल्याला येते. जगातील काही घडलेल्या महत्वपुर्ण घटना आंतरराष्ट्रीय संबंधातुन आपण अभ्यासत असतो.

6) आंतरराष्ट्रिय वादाला आवश्यक / पुरक :-
आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास केल्याने आपल्या खऱ्या राष्ट्रवादाचीही जाणिव होते. राष्ट्रवाद हा प्रत्येक नागरिकाला आपआपल्या राष्ट्रास निष्ठवंत राहण्यास शिकवतो असुरक्षीत जगात आपल्या राष्ट्रास सुरक्षीतता देतो हे देखील खरे असले तरी अतीरेकी राष्ट्रवाद जागतीक शांततेला प्रमुख अडथळा ठरतो. कारण राष्ट्रवादाच्या माध्यमातुन व्यक्ती ~~संकुच~~ संकुचित विचार करते इतर राष्ट्यातील नागरिकासंदर्भात द्वेष निर्माण करते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधाचा विचार आवश्यक असतो आ. रा. संबंध जर अभ्यासले गेले तर राष्ट्रवादीचि संकल्पना सुध्दा निश्चीत स्पष्ट होते राष्ट्रवाद ज्यापध्दतीने आपल्या राष्ट्राबद्दल अधिक प्रेम निर्माण करतो परस्पर सहिष्णुता निर्माण करतो त्याच पध्दतीने आंतरराष्ट्रीयवाद सुध्दा शांतता व सुरक्षीततेसाठी महत्त्वपुर्ण भुमिका

"राष्ट्रासाठी ~~स्वस्थ~~ सर्वस्व अर्पण करण्याचा
# विचार म्हणजे राष्ट्रवाद होय"

PAGE NO.:
DATE : / /

बजावतो आ. राष्ट्रवाद म्हणजे हे विश्व हे विश्व संबंध मानव जातीने व्यापलेले आहे आपण सर्व मानव प्राणी एकच आहोत असा विश्व व्यापक विचार आंतरराष्ट्रवादात असतो आ.रा. संबंधाच्या अभ्यासाने ही संकल्पना पुर्णत्वास जाऊ शकते.

7) आदर्श जगासाठी उपयुक्त :-

आदर्श जगाच्या निर्मितीच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय संबंध महत्वाचे असतात या विषयाच्या ज्ञानातुन आपल्याला राजकीय संकल्पनाचे स्पष्टीकरण मिळते आंतरराष्ट्रीय कायदा, नियम सामुहिक सुरक्षीतता, सत्ता संतुलन, शांतता -मय सह अस्तित्व आणि परस्पर सहकार्य यातुन आंतरराष्ट्रीय संघर्षाची सोडवणुक करणे व एक चांगले जग निर्माण करणे यासाठी आंतरराष्ट्रीय संबंध महत्वाचे असतात

★ समारोप :->

वरील मुद्याच्या आधारे आंतरराष्ट्रीय संबंधाचे महत्व स्पष्ट करताना जागतिक व्यवस्था अभ्यासण्यासाठी, राष्ट्रा--राष्ट्रातील संबंध समजुन घेण्यासाठी अलीकडील काळात अस्थिरतेच्या जगात शांतता व सुव्यवस्थेचा विचार रुजविण्यासाठी आंतरराष्ट्रीय संबंधा अभ्यासने आवश्यक असते.